MHGA080001202022

**<u>न्यायालय विद्यमान दिवाणी न्यायाधिश (कनिष्ठ स्तर), सिरोंचा</u>**
**<u>जिल्हा — गडचिरोली</u>**

( पिठासीन अधिकारी श्रीकांत एस. पचंडी )

**<u>नि.दि.दा.क्र. ०३/२०२२</u>**

**१. राजक्का लच्चन्ना नरवेदी,**
वय—७७ वर्षे, धंदा —शेती,
रा.कंबलपेठा, तह.सिरोंचा, जि.गडचिरोली.
**तर्फे खास मुखत्यार**
**शंकुतला लच्चन्ना नरवेदी,**
वय—४५ वर्षे, धंदा—शेती,
रा.कंबलपेठा,तह.सिरोंचा, जि.गडचिरोली. ... **<u>वादी/अर्जदार</u>**

**— <u>विरुध्द</u> —**

**१. रामन्ना आशालू आकुला,**
वय—५० वर्षे, धंदा—शेती,
रा.आयपेठा, तह.सिरोंचा,
जि.गडचिरोली.

**२. संतोष मारन्ना आकुला,**
वय—३५ वर्षे, धंदा—शेती,
रा.गुडुर, मंडल—काटाराम,
जि.करीमनगर तेलंगणा राज्य.

**३. विमला मारन्ना आकुला,**
वय—५८ वर्षे, धंदा—शेती,
रा.गुडुर, मंडल—काटाराम,
जि.करीमनगर तेलंगणा राज्य.

**४. समक्का सागर सेंसला,**
वय—४५ वर्षे, धंदा—शेती,
रा.गुडुर, मंडल—काटाराम,
जि.करीमनगर तेलंगणा राज्य.

५. **सारक्का शंकर इसमपेल्ली,**
वय—५० वर्षे, धंदा—शेती,
रा.गुडुर, मंडल—काटाराम,
जि.करीमनगर तेलंगणा राज्य.

६. **मारन्ना व्यंकन्ना बच्चलकूरा,**
वय—४५ वर्षे, धंदा—शेती,
रा.राईपेठा माल, तह.सिरोंचा,
जि.गडचिरोली.

७. **राजकुमार रामभाउ पुठावार,**
वय—२८ वर्षे, धंदा—शेती,
रा.कोटामाल, तह.सिरोंचा,
जि.गडचिरोली.

८. **लक्ष्मी पोच्चय्या बद्दी,**
वय—२८ वर्षे, धंदा—शेती,
रा.कोटामाल, तह.सिरोंचा,
जि.गडचिरोली.

९. **सुजाता श्रीनिवास कोल्लुरी,**
वय—३० वर्षे, धंदा—शेती,
रा.कोटामाल, तह.सिरोंचा,
जि.गडचिरोली. ... **प्रतिवादी/गैरअर्जदार**

---

**दावा हिस्से वाटपा करीता, कायम मनाईकरिता**

---

वादीतर्फे विद्वान विधिज्ञ ॲड. श्री. जे.एम.कोंडागोर्ला
प्रतिवादी क्र.६ ते ९ तर्फे विद्वान विधिज्ञ ॲड. श्री.एस.एस.चित्तावार

---

## आदेश *निशाणी क्र.०५ वरील*

### (दिनांक ०५ सप्टेंबर, २०२३ रोजी पारित)

०१) वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रकिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये प्रतिवादी क्र.६ ते ९ यांचे विरोधात तात्पुर्ता मनाई आदेश मिळावा याकरिता दाखल केला आहे. वादीने प्रस्तुतचा दावा वाटपा करीता, ताब्या करीता व कायम मनाईकरीता दाखल केला आहे.

०२) **<u>वादीचे थोडक्यात कथन असे की</u>**,

<u>दावा मिळमतीचे वर्णन पुढील प्रमाणे</u> :—

| **अ.क्र.** | **मौजा** | **भु.क्र.** | **आराजी** |
|---|---|---|---|
| १. | मौजा कोटामाल | ३० | ०.३६ हे.आर |
| २. | मौजा कोटामाल | ४४/२ | १.५५ हे.आर |
| ३. | मौजा राईपेठा | ६२ | ०.८३ हे.आर |
| ४. | मौजा राईपेठा | ६३ | ०.७२ हे.आर |

०३) वादीच्या कथनानुसार रामन्ना उर्फ रामय्या आकुला हे दावा मिळकतीचे मुळ मालक होते. वादी तसेच प्रतिवादी क्र. १ ते ५ हे रामन्ना उर्फ रामय्या आकुला यांचे कायदेशीर वारस आहेत.

०४) वादी यांचा दावा मिळकती मध्ये १/२ हिस्सा आहे. परंतु वादी ही लग्नानंतर तिच्या सासरी राहत होती. तसेच तिचा भाउ मारय्या उर्फ मारन्ना हा सतत बिमार असे. तो अविवाहित दिनांक २३/०६/२०१६ रोजी मयत झाला.

०५) वादी हिचा भाउ मयत झाल्या नंतर तिने प्रतिवादी क्र. १ ते ५ यांच्याकडे दावा मिळकती मधील आपला १/२ हिस्सा तुटक करुन देण्याची मागणी केली. परंतु प्रतिवादी यांनी त्यास नकार दिला. वादी हिने अभिलेखाचे अवलोकन केले असता तिला असे दिसुन आले की, प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी बनावट अभिलेख बनवून वादी हिचा भाउ दिनांक ३०/०४/२००२ रोजी मयत झाला आहे असे दर्शवून सर्व दावा मिळकत आपल्या नावे हस्तांतरीत करुन घेतली आहे. तसेच वादी यांनी प्रस्तुत दावा मिळकत ही प्रतिवादी क्र. ६

ते ९ यांना नोंदणीकृत खरेदी खताने विक्री केली आहे.

०६) वादी हिचा दावा मिळकती मध्ये १/२ हिस्सा आहे. परंतु सदर मिळकत हि प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांना विक्री केली आहे. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हिस्से वाटप तसेच कब्जे करीता दाखल केला आहे. प्रस्तुत दावा गुणदोषावर चालवून न्यायनिर्णीत होणेस थोडा कालावधी जाणार आहे. सदर दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो प्रतिवादी क्र.६ ते ९ यांनी विकत घेतलेली दावा मिळकत त्रयस्थ व्यक्तीस हस्तांतरीत करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम मिळावा या करीता प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांचे विरोधात दाखल केला आहे.

०७) प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांनी निशाणी २९ येथे म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे. प्रतिवादी क्र.६ ते ९ यांनी वादी या रामन्ना उर्फ रामय्या आकुला यांच्या वारस आहेत अगर कसे याबाबत माहिती नसल्याने अमान्य असे कथन केले आहे. प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांनी वादी यांच्या दाव्यातील उर्वरित मजकुराचे खंडण केले आहे.

०८) प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांनी आपल्या विशेष कथना मध्ये असे कथन केले आहे की, त्यांनी दावा मिळकत ही नोंदणीकृत खरेदी खताने खरेदी केली आहे. तसेच दावा मिळकती वर प्रतिवादी क्र ६ ते ९ यांचा ताबा आहे. वादी यांनी केवळ दावा मिळकत हडपण्याच्या हेतूने प्रस्तुत दावा दाखल केला असल्यामुळे प्रस्तुत अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०९) वादी यांनी आपल्या अर्जाच्या अनुषंगाने दाव्यासोबत नि.क्र.०४ अनुक्रमांक १ येथे खास मुखत्यार नामा ची अस्सल प्रत, अनुक्रमांक २ येथे

मौजा कोटामाल, तह.सिरोंचा येथील गट क्र. ३० च्या सातबा—याची झेरॉक्स प्रत, अनुक्रमांक ३ येथे मौजा कोटामाल येथील गट क्र. ४४/२ च्या सातबा—याची झेरॉक्स प्रत, अनुक्रमांक ४ येथे मौजा राईपेठा माल तह. सिरोंचा येथील गट क्र. ६२ च्या सातबा—याची झेरॉक्स प्रत, अनुक्रमांक ५ येथे मौजा राईपेठा माल तह.सिरोंचा येथील गट क्र. ६३ च्या सातबा—याची झेरॉक्स प्रत, अनुक्रमांक ६ येथे मौजा कोटामाल येथील फेरफार क्र. १९० ची स.शी. नक्कल, अनुक्रमांक ७ येथे मौजा राईपेठा माल येथील फेरफार क्र. ८३ ची स.शी. नक्कल, अनुक्रमांक ८ येथे मौजा कोटामाल येथील फेरफार क्र. २०९ ची स.शी. नक्कल, अनुक्रमांक ९ येथे मौजा कोटामाल येथील फेरफार क्र. २१० ची स.शी. नक्कल, अनुक्रमांक १० येथे मौजा राईपेठा येथील फेरफार क्र. ९० ची स.शी. नक्कल, अनुक्रमांक ११ येथे मौजा राईपेठा माल येथील भु.क्र. ३३ चा सन १९८९—९० ते १९९३—९४ च्या सातबा—याची स.शी. नक्कल, अनुक्रमांक १२ येथे नोंदणीकृत खरेदी खत नंबर स.र.च.३३/२०२१ ची स.शी. नक्कल, अनुक्रमांक १३ येथे नोंदणीकृत खरेदी खत नंबर स.र.च.३४/२०२१ ची स.शी. नक्कल, अनुक्रमांक १४ येथे नोंदणीकृत खरेदी खत नंबर स.र.च.४०/२०२१ ची स.शी. नक्कल, अनुक्रमांक १५ येथे नोंदणीकृत खरेदी खत नंबर स.र.च.३५/२०२१ ची स.शी. नक्कल, अनुक्रमांक १६ येथे वारस दाखला ची झेरॉक्स प्रत, अनुक्रमांक १७ येथे आकुला मारया पोचन्ना याच्या मृत्यु प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत इत्यादी कागदोपत्री पुरावा हजर केला आहे.

१०) प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा हजर केलेला नाही.

११) वादी तर्फे वकील श्री.जे.एम.कोंडागोर्ला यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी आपल्या अर्जातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला. प्रतिवादी तर्फे वकील श्री.एस.एस.चित्तावार यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. सबब प्रतिवादी तर्फे कोणताही युक्तीवाद करण्यात आला नाही.

१२) वादी व प्रतिवादी यांची कथने, त्यांनी दाखल केलेला कागदोपत्री पुरावा तसेच वादी तर्फे वकीलांचा युक्तीवाद या सर्व गोष्टीतुन पुढील प्रश्न माझ्या विचारधिन निर्माण झाले. त्यांचे उत्तर कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | वादी यांनी त्यांना सकृतदर्शनी केस असल्याचे सिध्द केले आहे काय? | **होकारार्थी** |
| ०२. | न्यायाचा तराजु वादी यांच्या बाजुने झुकल्याचे वादी यांनी शाबीत केले आहे काय? | **होकारार्थी** |
| ०३. | प्रस्तुतचा अर्ज नामंजुर झाल्यास वादी यांचे कशानेही भरुन न येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे काय? | **होकारार्थी** |
| ०४. | काय आदेश? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

### प्रश्न क्रमांक ०१ ते ०३ करिता:—

१३) प्रश्न क्र.१ ते ३ हे परस्परांशी निगडित असल्यामुळे वारंवारता टाळण्याकरीता तसेच सोयीच्या दृष्टीने मी प्रश्न क्र.१ ते ३ चे विवेचन एकत्रितपणे करत आहे.

१४) वादी यांच्या कथनानुसार दावा मिळकत ही वादी यांची वडिलोपार्जित जमिन आहे. वादी हे मयत रामन्ना आकुला यांचा मुलगा मयत पोचम आकुला यांची मुलगी आहे. मयत पोचम आकुला यांना मारय्या उर्फ मारन्ना हा मुलगा देखील होता. परंतु तो अविवाहित मयत झाल्याने पोचम आकुला व त्यानंतर मारय्या उर्फ मारन्ना पोचम आकुला यांना वादी ही एकमेव वारस आहे. प्रस्तुत बाब शाबित करण्याकरीता वादी यांनी निशाणी ०४ अनुक्रमांक १६ येथे दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, सिरोंचा यांच्या कडील कि.दि.मा.क्र.०३/२०२१ मधील वारस दाखला प्रत हजर केली आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, राजक्का लच्चन्ना नरवेदी हि मारय्या उर्फ मारन्ना पोचन्ना आकुला यांची वारस आहे.

१५) प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांनी वादी या मयत रामन्ना उर्फ रामय्या आकुला यांच्या कायदेशीर वारस आहेत अगर कसे याबाबत माहिती नसल्याने अमान्य असे कथन केले आहे. त्यावरुन वादी या मयत रामन्ना उर्फ रामय्या आकुला यांच्या कायदेशीर आहेत ही बाब प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांनी ठामपणे नाकारलेली नसल्याचे दिसुन येते. तसेच दावा मिळकतीचे मुळ मालक रामन्ना उर्फ रामय्या आकुला हे होते अगर कसे हे देखील प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांनी माहिती नसल्याने अमान्य असे कथन केल्याने ही बाब देखील प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांनी ठामपणे नाकारलेली नसल्याचे दिसुन येते.

१६) एकंदरीत वादी यांनी निशाणी ०४ अनुक्रमांक १६ येथे हजर केलेल्या वारस दाखल्याचे अवलोकन केले असता त्या मारय्या उर्फ मारन्ना पोचम आकुला तसेच पोचम आकुला यांच्या वारस असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते.

१७) वादी यांच्या कथना नुसार त्यांचा भाउ मारय्या उर्फ मारन्ना पोचम आकुला यांचा दिनांक २३/०६/२०१६ रोजी मृत्यु झाला. परंतु प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी बनावट दस्ताऐवज बनवून मारय्या उर्फ मारन्ना हा दिनांक ३०/०४/२००२ रोजी मयत झाला असे दाखवून तसेच त्यास इतर कोणी वारस नाही हे दर्शवून आपले नाव दावा मिळकतीच्या वारस सदरी नमुद करुन घेतले. प्रस्तुत बाब शाबित करण्याकरीता वादी यांनी निशाणी ०४ अनुक्रमांक ६ येथे मौजा कोटामाल तह.सिरोंचा येथील फेरफार क्र. १९० ची स.शी. नक्कल, तसेच अनुक्रमांक ७ येथे मौजा राईपेठा येथील फेरफार क्र. ८३ ची स.शी. नक्कल हजर केली आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, मारय्या पोचम आकुला हे दिनांक ३०/०४/२००२ रोजी मयत झाले असल्याने दावा मिळकती सदरी प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचे नाव नमुद करण्यात आले आहे. परंतु मारय्या पोचम आकुला हे दिनांक ३०/०४/२००२ रोजी मयत झालेले नसून त्यांचा मृत्यु दिनांक २३/०६/२०१६ रोजी झाला आहे हे दर्शविण्याकरीता वादी यांनी निशाणी ०४ अनुक्रमांक १७ येथे आकुला मारया पोचन्ना यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत हजर केली आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, आकुला मारया पोचन्ना यांचा मृत्यु मौजा कंबलपेठा तह.सिरोंचा येथे दिनांक ३०/०६/२०१६ रोजी झाला आहे. प्रस्तुत बाब हि वादी यांच्या कथनास बळकटी देणारी आहे.

१८) वादी यांच्या कथना नुसार प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांनी दावा मिळकत प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचेकडून नोंदणीकृत खरेदी खताने खरेदी केली आहे. प्रस्तुत बाब प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांनी नाकारलेली नाही. एकंदरीत वादी यांनी दाव्या मध्ये दर्शविलेली वंशावळ हि प्रतिवादी यांनी अमान्य न करणे तसेच निशाणी ०४ अनुक्रमांक १६ येथील वारस दाखला याचे

अवलोकन केले असता वादी या रामन्ना उर्फ रामय्या आकुला यांच्या कायदेशीर वारस असल्याचे दिसुन येते. तसेच दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र. १ ते ५ यांची वडिलार्जित मिळकत असल्याचे देखील प्रतिवादी यांनी नाकारलेली नाही. त्यामुळे वादी यांचा दावा मिळकती मध्ये हिस्सा आहे ही बाब सकृतदर्शनी दिसुन येते.

१९) तसेच निशाणी क्रमांक ०४ अनुक्रमांक ६ व ७ येथील फेरफारीचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी मारय्या पोचम आकुला हे दिनांक ३०/०४/२००२ रोजी मयत झाल्या नंतर त्यांना इतर कोणीही वारस नाही असे दर्शवून आपले नाव दावा मिळकती च्या वारस सदरी लावून घ ेतल्याचे दिसुन येते. परंतु वादी यांनी निशाणी ०४ अनुक्रमांक १७ येथे हजर केलेल्या मृत्यु प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता मारय्या पोचम आकुला यांचा मृत्यु दिनांक ३०/०४/२००२ रोजी झाला की २३/०६/२०१६ रोजी झाला याबाबत साशंकता असल्याचे देखील दिसुन येते. त्यामुळे वादी यांना सकृतदर्शनी केस असल्याचे शाबित होते.

२०) वादी यांच्या कथनानुसार प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी दावा मिळकत ही प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांना नोंदणीकृत खरेदी खताने विक्री केली आहे. प्रस्तुत बाब प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांनी नाकारलेली नाही. यदाकदाचित वादी कथन करतात त्याप्रमाणे प्रतिवादी यांनी दावा मिळकत त्रयस्थ व्यक्तीस विक्री केल्यास निश्चितच वादी यांचे कशानेही भरुन न येणारे असे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच दाव्याची क्लिष्टता देखील वाढणार आहे.

२१) एकंदरीत वादी यांच्या दाव्यातील कथने त्यांनी हजर केलेला कागदोपत्री पुरावा तसेच प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांनी दाखल केलेले म्हणणे यांचा एकत्रितपणे साकल्याने विचार केला असता निश्चितच न्यायाचा तराजू हा वादी यांच्या बाजूने झुकलेला दिसुन येतो. त्यामुळे मी प्रश्न क्रमांक १ ते ३ यांचे उत्तर होकारार्थी नोंदवत आहे.

**प्रश्न क्रमांक ०४ करीता.**

२२) वादी यांच्या दाव्यातील व अर्जातील कथने तसेच वादी यांनी हजर केलेला कागदोपत्री पुरावा यांचे अवलोकन करुन मी प्रश्न क्रमांक १ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवून प्रश्न क्रमांक ०४ करीता पुढील आदेश पारीत करीत आहे.

:::: **आदेश** ::::

०१) वादी यांचा अर्ज नि.क्र.०५ मंजुर करण्यात येत आहे.

०२) प्रतिवादी क्र.६ ते ९ यांनी प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल लागे पावेतो दावा मिळकत कोणाही त्रयस्थ व्यक्तीस विक्री करु नये असा तात्पुरता मनाई आदेश पारीत करण्यात येतो.

०३) अर्जाचा खर्च मुळ दाव्यामध्ये विचारात घेण्यात येईल.

Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2023.09.08 18:08:25 +0530

स्थळ : सिरोंचा
दिनांक: ०५/०९/२०२३.

( श्रीकांत एस. पचंडी )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
सिरोंचा.

MHGA080001202022

नियमित दिवाणी दावा क्र. ०३/२०२२,
राजक्का - विरुध्द -रामन्ना व इतर.

**प्रमाणपत्र**

मी शपथेवर सांगतो की, पी.डी.एफ. आदेशामधील मजकूर हा मुळ आदेशातील मजकुराप्रमाणे शब्द-न-शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | विठ्ठल विश्वांभर मिठ्ठेवाड लघुलेखक (श्रेणी-३) |
| न्यायालयाचे नाव | : | दिवाणी व फौजदारी न्यायालय, सिरोंचा. |
| आदेशाची तारीख | : | ०५/०९/२०२३. |
| मा.पिठासीन अधिकारी यांनी आदेशावर सही केल्याची तारीख | : | ०५/०९/२०२३. |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | : | ०८/०९/२०२३. |